# मेट्रो-३ च्या हुतात्मा चौक स्थानकाला हेरिटेज वास्तूंचे कोंदण

## हेरिटेज वास्तूंच्या २५३ मीटर खाली स्थानकाचे बांधकाम; ८२ टक्के काम पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ हा एकमेव भुयारी मेट्रो मार्ग अनेक बाबींमुळे वैशिष्ट्यपूर्ण असून या मार्गाच्या दक्षिण मुंबईतील हुतात्मा चौक स्थानकाला तब्बल दहा हेरिटेज वास्तूंचे कोंदण लाभले आहे.

यातील बहुसंख्य वास्तू या ब्रिटिश काळात बांधल्या गेल्या आहेत. या हेरिटेज वास्तूंसोबतच गिरगाव आणि काळबादेवीतील अनेक जुन्या इमारतीही या मार्गात आहेत. हुतात्मा स्थानकाचे ८२ टक्के काम पूर्ण झाले असून ट्रॅक टाकण्याचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. विद्युतीकरण आणि अन्य कामे ५० टक्के पूर्ण झाली आहेत. हे स्थानक बांधताना तब्बल दहा हजार अत्यंत लहान स्वरूपाचे स्फोट घडवण्यात आले होते. हेरिटेज वास्तूंच्या २५३ मीटर खाली हे स्थानक बांधण्यात आले आहे.

मेट्रो ३ हा मार्ग वैशिष्ट्यपूर्ण आहे. हा मार्ग मुंबईतील ६ महत्वपूर्ण व्यावसायिक केंद्रांशी, ३० शैक्षणिक संस्था, ३० मनोरंजनाची ठिकाणे आणि तसेच स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडणारा आहे.

मेट्रो कुलाबा-वांद्रे-सिप्झ पट्ट्यामधून धावेल व नरीमन पॉइंट, वांद्रे-कुर्ला संकुल, फोर्ट, लोअर परळ, गोरेगाव इत्यादी आर्थिक केंद्रांना जोडेल. मेट्रोमुळे विमानतळ, नरीमन पॉइंट, कफ परेड, काळबादेवी, वरळी, वांद्रे-कुर्ला संकुल, विमानतळ, सिप्झ व एमआयडीसी प्रथमच जोडले जातील. त्याशिवाय मुंबई मेट्रो-३ च्या मार्गामुळे चर्चगेट व छत्रपती शिवाजी टर्मिनलसारखी ऐतिहासिक वारसा असलेली स्थानके सुद्धा जोडली जातील.

चर्चगेट, छत्रपती शिवाजी टर्मिनस, मुंबई सेंट्रल व महालक्ष्मी येथे प्रवाशांना मेट्रो-३ व इतर उपनगरीय रेल्वे मार्गावरील गाडयांची अदलाबदल करता येईल. शहराच्या रेल्वे नसलेल्या भागाच्या जवळ रेल्वे सेवा घेऊन जाण्यासाठी; सध्याच्या उपनगरीय रेल्वे गाड्या मुंबई मेट्रो-३ च्या बरोबरीने सेवा देतील.



● मुंबई मेट्रो-३ मुळे रहदारीचा होणारा खोळंबा टाळता येईल. या प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यावर या पट्ट्यातील रहदारी सुमारे ३५ टक्क्यांनी कमी होईल. वाहनसंख्या सुमारे साडेचार लाखांनी कमी होऊन रस्त्यांवरील कोंडी कमी होईल. या मार्गामुळे प्रवासाच्या वेळेतही घट होईल. सध्या कफ परेड ते विमानतळ हे अंतर पूर्ण करण्यासाठी १०० मिनिटे लागतात. मेट्रो-३ मुळे हा प्रवास ५० मिनिटांत पूर्ण होईल.